# नांदेड जिल्ह्यातील प्रौढ तृतीयपंथी यांची सामाजिक स्वीकृती : एक अभ्यास

**डॉ. सिद्धार्थ सुधाकरराव होवाळ**
सहयोगी प्राध्यापक,
महात्मा फुले एम.एड. महाविद्यालय, जळकोट

**गोषवारा:**

*हे संशोधन समाजातील तृतीयपंथी यांच्या सामाजिक स्वीकृतीचा शोध घेते. गुणात्मक आणि संख्यात्मक दोन्ही पद्धतीचा उपयोग करून तृतीयपंथीबाबतचे सामाजिक घटक निश्चित करुन विशेषतः प्रौढ तृतीयपंथी यांच्या आव्हानांना समजून घेण्यावर लक्ष केंद्रित केलेले आहे. या अभ्यासासाठी प्रश्नावलीची रचना केलेली असून काही मुलाखती घेतलेल्या आहेत. प्रौढ तृतीयपंथी यांच्या सामाजिक स्वीकृतीसंदर्भात समस्या आढळून येतात. तृतीयपंथी यांना मानवी हक्क मिळावेत व योग्य सन्मान मिळावा यासाठी धोरणात्मक निर्णय आवश्यक आहेत. प्रौढ तृतीयपंथीच्या सामाजिक स्वीकृतीकडे लक्ष वेधण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक आहे. लैंगिक विविधतेबद्दल माहिती समाविष्ट असलेल्या व्यापक लैंगिक शिक्षण कार्यक्रमाचा समावेश शालेय अभ्यासक्रमात होऊ शकतो. अधिक समावेशक समाज तयार करण्यासाठी शासन (राज्यकर्ते), समाज प्रबोधनकार, शिक्षक, विविध माध्यमे यांनी योग्य भूमिका घेणे आवश्यक आहे,सदर संशोधन कार्य करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला आहे. प्रश्नावलीच्या माध्यमातून निष्कर्ष मांडले आहेत.*

**प्रस्तावना :**

तृतीयपंथी यांची सामाजिक स्वीकृती हा सध्याच्या समाजातील एक महत्त्वाचा मुद्दा आहे, ज्यांच्याबाबत सतत भेदभाव होत असल्याचे दर्शवतो तो म्हणजे तृतीयपंथी. तृतीयपंथी म्हणजे साधारणपणे स्त्री किंवा पुरुष अशी नक्की लिंग ओळख नसलेल्या व्यक्तींचा समूह LGBTIQ. तृतीयपंथीना अनेक सामाजिक समस्या तोंड द्यावे लागते. योग्य दृष्टिकोनाअभावी तसेच चुकीच्या समजुतींमुळे समाज या समूहाकडे वेगळ्या नजरेने बघतो. अशा घटकांवर प्रकाश टाकणे आवश्यक आहे. सहानुभूती वाढविण्यासाठी, रूढीवादीपणा नष्ट करण्यासाठी आणि प्रौढ तृतीयपंथी व्यक्तींसाठी समानता आणि सन्मानाने जीवन जगण्यासाठी सामाजिक स्वीकृती महत्त्वपूर्ण आहे. हे संशोधन एक चांगला समाज तयार करण्यासाठी हातभार लावण्याचा प्रयत्न करीत आहे. जिथे तृतीयपंथी लोकांचा आदर केला जातो, त्या समाजाची अधिक प्रगती होते. प्रौढ तृतीयपंथी व्यक्तींना संस्कृती आणि समाजात नेहमीच उपेक्षितपणा सहन करावा लागला आहे. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत, त्यांना बऱ्याचदा भेदभाव, हिंसाचार आणि सामाजिक

बहिष्काराचा सामना करावा लागला आहे. हा संदर्भ समजून घेऊन आपल्या समाजातील प्रौढ तृतीयपंथी व्यक्तींसाठी सामाजिक स्वीकृती आवश्यक आहे हे लक्षात घेतले पाहिजे. तृतीयपंथी व्यक्तींच्या हक्कांशी संबंधित कायदेशीर चौकट मोठ्या प्रमाणात बदलताना दिसत आहे. ज्यामुळे तृतीयपंथी व्यक्तींच्या जीवनावर चांगले परिणाम होणे अभिप्रेत आहे. तृतीयपंथी लोकांच्या हक्कांना पुढे आणण्याच्या प्रयत्नांमध्ये कायद्याबरोबर, माध्यमांचे चित्रण व जनजागृतीची गरज आहे. तृतीयपंथी लोकांना चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते. शाळांमध्ये शिक्षक लैंगिक शिक्षणाबद्दल बोलू शकतात आणि प्रत्येक जीवाचा आदर करणे महत्त्वाचे आहे. असे संस्कार देऊ शकतात. पालक आणि प्रत्येकजण तृतीयपंथी लोकांना समजून घेईल आणि स्वीकारेल तेव्हा हे जग अधिक सुंदर बनताना दिसेल.

**संशोधनाचे उद्दिष्ट :**

1. प्रौढ तृतीयपंथी व्यक्तींच्या सामाजिक स्वीकृतीबाबतच्या समस्यांच्या शोध घेणे.

2. प्रौढ तृतीयपंथी व्यक्तींच्या सामाजिक स्वीकृतीबाबतच्या समस्यांवर उपाययोजना सुचविणे.

**संशोधनाची गरज** –

अ) जीवशास्त्राचा विचार करता अस्तित्त्वासाठी प्रस्तुत विषय खूप गरजेचा आहे.

आ) या समुदायाला योग्य दिशा मिळाली तर उत्पादनक्षमतेत वाढ होईल.

**संशोधनाचे महत्व** -

अ) प्रौढ तृतीयपंथी व्यक्तींची सामाजिक स्वीकृती वृद्धिंगत करण्यासाठी कृतीकार्यक्रमाचे आयोजनासाठी पूरक ठरेल.

आ) सामाजिक स्वीकृती साठीच्या आवश्यक घटकांचा समावेश अभ्यासक्रमात करता येईल.

**संशोधन व्याप्ती व मर्यादा :**

1. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी प्रौढ तृतीयपंथीचाच विचार करण्यात आलेला आहे.
2. सदर संशोधन कार्यासाठी प्रौढ तृतीयपंथीच्या सामाजिक समस्यांचाच विचार केलेला आहे.
3. प्रस्तुत संशोधन कार्य केवळ शैक्षणिक वर्ष 2021-2022 या कालावधीपुरते मर्यादित आहे. त्याचबरोबर प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे न्यादर्शातील प्रतिसादकांनी दिलेल्या प्रतिसादावर अवलंबून आहेत.

**परिमर्यादा :-** प्रस्तुत संशोधन हे पुढील घटकांसाठी परीमर्यादित आहे.

अ. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे महाराष्ट्र राज्यातील नांदेड जिल्ह्यातील प्रौढ तृतीयपंथीपुरतेच मर्यादित आहेत.

ब. प्रस्तुत संशोधनात प्रौढ तृतीयपंथी व्यक्तींची सामाजिक समस्यांचाच अभ्यास अपेक्षित आहे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनात रेल्वे स्थानकापासून ते इतरत्र आढळणाऱ्या प्रौढ तृतीयपंथी व्यक्तींच्या सामाजिक स्वीकृतीच्या दृष्टीकोनातून अभ्यासताना त्यांना येणाऱ्या सामाजिक समस्याची सद्यस्थिती अभ्यासण्यासाठी वर्णनात्मक संशोधनातील सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आले.

**न्यादर्श :**

प्रस्तुत संशोधनासाठी न्यादर्श निवडताना संशोधकाने नांदेड जिल्ह्यातील सहजप्राप्त 200 प्रौढ तृतीयपंथी यांची निवड करून माहिती संकलित केलेली आहे.

**माहिती संकलनाची साधने** : सदर संशोधन कार्यासाठी उद्दिष्टानुसार माहिती संकलनासाठी प्रश्नावली हे साधन स्वतः संशोधकाने तयार करून वापरलेले आहे. या प्रश्नावली मधील प्रश्नात विविधता आणण्याचा प्रयत्न केला आहे. ज्यामध्ये बहुपर्यायी, मुक्त स्वरूपाचे प्रश्न आहेत. प्रस्तुत प्रश्नावलीची विश्वसनियता व सप्रमानता तपासून संकलित माहितीचे अर्थनिर्वचन केलेले आहे.

**संख्याकिय तंत्र** : संकलित माहितीस अर्थ लावण्यासाठी शेकडेवारीच्या माध्यमातून विश्लेषण करून अर्थनिर्वचन केले आहे.

**प्राप्त माहितीचे विश्लेषण दर्शविणारा तक्ता:**

| अ.क्र. | प्रश्न विवरण | पर्याय 1 | पर्याय 2 | पर्याय 3 | पर्याय 4 |
|---|---|---|---|---|---|
| 1 | समाजाचा तृतीयपंथीयांकडे पाहण्याचा दृष्टिकोन विषयक प्रतिसाद | 8 | 7 | 163 | 22 |
| 2 | तृतीयपंथीयांच्या सुखदुःखात सहभाग विषयक प्रतिसाद | 18 | 142 | 16 | 24 |
| 3 | तृतीयपंथी यांचा व्यवसायबाबत प्रतिसाद | 12 | 22 | 125 | 41 |
| 4 | समाजातील घटकांची मैत्रीपूर्ण संबंध विषयक प्रतिसाद | 8 | 175 | 7 | 10 |
| 5 | मानवी हक्काबाबत जाणीवजागृती विषयक प्राप्त प्रतिसाद | 152 | 13 | 28 | 7 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 6 | तृतीयपंथी यांना व्यक्ती म्हणून स्वीकारणे बाबत प्रतिसाद | 9 | 13 | 11 | 167 |
| 7 | तृतीयपंथी यांचा आजार विषयक प्रतिसाद | 13 | 151 | 17 | 19 |
| 8 | तृतीयपंथी यांचा शासकीय योजनेतील सहभाग विषयक प्रतिसाद | 24 | 42 | 33 | 101 |
| 9 | नोकरीतील सहभाग प्रतिसाद | 5 | 13 | 165 | 17 |
| 10 | तृतीयपंथी यांचा शालेय शिक्षणातील सहभाग विषय प्रतिसाद | 31 | 140 | 23 | 6 |

**विश्लेषण :**

1. समाजाचा तृतीयपंथीयांकडे पाहण्याचा दृष्टिकोन विषयक प्रतिसाद 81% दिसून आला.
2. तृतीयपंथीयांच्या सुखदु:खात सहभाग विषयक प्रतिसाद 71% प्राप्त झाला.
3. मानवी हक्काबाबत जागृती विषयी केवळ 3 % प्रतिसाद मिळाला.
4. तृतीयपंथी यांना व्यक्ती म्हणून स्वीकारले जात नाही याबाबत 83% इतका प्रतिसाद प्राप्त झाला.
5. 70 % तृतीयपंथी यांना गुप्तरोग असण्याबाबत प्रतिसाद मिळाला.

**अर्थनिर्वचन:**

1. बहुसंख्य तृतीयपंथीयांच्या मते समाजाचा तृतीयपंथीयांकडे पाहण्याचा दृष्टिकोन विकृत आहे.
2. तृतीयपंथी यांच्या सुखदु:खात सहभागी होण्याचे प्रमाण निम्म्याहून अधिक आहे.
3. अल्प तृतीयपंथी यांना मानवी हक्काबाबत जागृती विषयी माहिती आहे.
4. अल्प प्रमाणात तृतीयपंथी यांना व्यक्ति म्हणून स्वीकारले जाते.
5. निम्म्याहून अधिक तृतीयपंथी यांना गुप्तरोग आहे.

**निष्कर्ष:**

1. समाजाचा तृतीयपंथीकडे बघण्याचा दृष्टिकोन विकृत आहे.
2. तृतीयपंथीकडे तरुण मुले अश्लील भावनेने पाहतात.
3. तृतीयपंथी सोबत बोलताना लैंगिक बाबीवरच बोलले जाते.
4. प्रौढ तृतीयपंथीच्या सुखदु:खात सहभागी होणारे व त्यांना आधार देणारे फार कमी व्यक्ती असतात.
5. प्रौढ तृतीयपंथी यांचे शिक्षणाचे प्रमाण फारच नगण्य आहे.
6. प्रौढ तृतीयपंथी यांचे व्यवसाय व राजकारणात सहभाग फारच कमी आहे.
7. प्रौढ तृतीयपंथी यांचे समाजातील सामान्य लोकांशी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण होत नाहीत.
8. प्रौढ तृतीयपंथी यांच्यामध्ये मानवी हक्कांबाबत जागरूकता नाही.
9. प्रौढ तृतीयपंथी यांचे सामाजिक विश्व मर्यादित असते.
10. प्रौढ तृतीयपंथी यांना व्यक्ती म्हणून स्वीकारले जात नाही.
11. तृतीयपंथी हे विविध गुप्तरोगाने त्रस्त आहेत.
12. तृतीयपंथी यांचे शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे प्रमाण कमी आहे.
13. तृतीयपंथी यांचे नोकरीतील प्रमाण कमी आहे.

**शिफारशी :**

1. समाजामध्ये तृतीयपंथी यांच्याबाबत विविध उपक्रमातून जाणीवजागृती करावे.
2. तृतीयपंथी यांना शासकीय योजनांचा लाभ घेता यावा यासाठी प्रयत्न करावा.
3. तृतीयपंथी यांच्यासाठी दिव्यांगाप्रमाणे विशेष शिक्षण अथवा एकात्मिक शिक्षणाची सोय करावी.
4. तृतीयपंथी यांना रोजगार उपलब्ध करून द्यावा.

**सारांश:**

`प्रत्येकाने तृतीयपंथी लोकांना समजून घेणे आणि स्वीकारणे महत्त्वाचे आहे. त्यांच्याशी सर्वजण निष्पक्ष आणि

आदराने वागतील याची काळजी घेतली गेली पाहिजे. कायद्याने त्यांच्या हक्कांचे संरक्षण केले पाहिजे, जसे की भेदभाव न करता नोकरी, आवश्यक सोयी-सुविधा मिळणे.त्यांच्या कथा, कार्यक्रम, मुलाखती, यशस्वी वाटचाली अशा अनेक बाबी माध्यमांनी चांगल्या प्रकारे लोकांसमोर आणल्या पाहिजेत. त्यांचे प्रश्न समजून घेण्यास मदत करण्यासाठी त्यांच्या कथा सकारात्मक व निपक्षपाती पद्धतीने दाखवल्या पाहिजेत. सुरक्षित आणि सर्वसमावेशक वातावरण निर्माण करण्यासाठी शाळांनी वेगवेगळ्या लैंगिक शिक्षणावर भर देऊन तो विषय शिकवला पाहिजे. प्रौढ तृतीयपंथी लोकांना कुटुंब, समुदाय आणि समाजाकडून पाठिंबा मिळणे देखील महत्त्वाचे आहे. एकत्र काम करून आणि हे बदल करून, आपण असे जग निर्माण करू शकतो जिथे तृतीयपंथी लोकांचा आदर केला जातो आणि त्यांना समान वागणूक दिली जाते. प्रत्येक व्यक्ती स्वीकारण्यास पात्र आहे..एवढा समजूतदारपणा आणि सहानुभूती वाढवून, आपण असा समाज तयार करू शकतो जिथे प्रत्येकजण आनंदाने आणि स्वतंत्रपणे, अभिमानाने जगू शकेल.

**संदर्भ :**

1. Dr. Binoy Gupta,(2023) Law of Transgender Rights in India, Ukiyoto Publishing.
2. Dr. Madhusudhan B.(2021), Transgender Rights: Identity And Mobility, Kalpaz Publications
3. Kalki Subramaniam(2021), We Are Not The Others: Reflections of a Transgender Artivist, Notion Press Media Pvt Ltd, Chennai
4. बिन्द कुमार चौहान, पासी संगीता कुमारी(2022), किन्नर विमर्श-शिक्षा,समाज और साहित्य, हंस प्रकाशन , नई दिल्ली.
5. भिंताडे, वि. रा. (१९९९), शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे, नूतन प्रकाशन.